**नवी मुंबई महानगरपालिका**

**महापालिका सर्वसाधारण सभा**

महानगरपालिकेच्या शुक्रवार, दिनांक 20 जुलै 2018 रोजी भरलेल्या माहे जुलै 2018 महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 01 दिनांक 20 जुलै 2018** | **इतिवृत्त** - दिनांक 20 मार्च 2018. दिनांक 26 मार्च 2018. दिनांक 27 मार्च 2018. दिनांक 28 मार्च 2018. दिनांक 20 एप्रील 2018. दिनांक 18 मे 2018 (भाग 1 व 2). |
| **निर्णय** | **कायम** |
| **विषय क्र. 02. दिनांक 20 जुलै 2018.** | **प्रश्नोत्तरे** |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 53. दिनांक 20 जुलै 2018.** | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात "शहर गतिशील योजना (CITY MOBILITY PLAN)" राबविणेस मंजुरी मिळणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/07/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1396/2018. |
| **ठराव क्र. 414. दिनांक 20 जुलै 2018.** | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात "शहर गतिशील योजना (CITY MOBILITY PLAN)" राबविणेस मंजुरी मिळणेबाबतच्या धोरण निश्चित करण्याबाबतच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, शहरातील अंतर्गत वाहतुक कोंडी कमी होण्यासाठी व नागरिकांचा प्रवास सुकर होणेसाठी शहरामध्ये "शहर गतिशील योजना(CITY MOBILITY PLAN)" राबविण्यास, प्रस्तावातील 18 कामे या योजनेमध्ये प्रस्तावीत आहे. या कामांना आवश्यकतेनुसार प्रत्येक कामास स्वतंत्र प्रशासकिय मंजूरी घेण्याबाबतच्या प्रस्तावास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 03. दिनांक 20 जुलै 2018.** | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात "जन सायकल सहभाग प्रणाली (Public Bicycle sharing System)" राबविणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 07/04/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/1092/2018. |
| **ठराव क्र. 415. दिनांक 20 जुलै 2018.** | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात "जन सायकल सहभाग प्रणाली (Public Bicycle sharing System)" राबविणेच्या प्रस्तावातील 1) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात "जन सायकल सहभाग प्रणाली (Public Bicycle sharing System)" प्रथमत: प्रायोगिक तत्वावर राबविण्यासाठी महानगरपरालिकेच्या आर्थिक सहकार्याविना खाजगी संस्थेकडून RFP (Request for Proposal) मागविण्यास, 2) आणि RFP (Request for Proposal) व जाहिरातीद्वारे प्राप्त प्रस्तावानुसार जास्तीत जास्त देकार नमुद करणाऱ्या संस्थेची निवड करून त्यांचे समवेत करारमुल्य कराराच्या अटी शर्ती आणि कालावधी निश्चित करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करण्यास, 3) व आवश्यकतेनुसार सायकली ठेवणेसाठी विविध ठिकाणी जागा उपलब्ध करून देणेसाठी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 अन्वये, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |

**सही/-**

**(चित्रा बाविस्कर)**

**महापालिका सचिव**

**नवी मुंबई महानगरपालिका**